पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ९८२ /२०२३ दि. ०३/११/२०२३

## –: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** उल्हासनगर शहरातील कॅम्प नं. २ व ३ मधील नेहरू चौक ते शिरू चौक या दरम्यान गजानन मार्केट, पटेल मार्ट ते नेहरू चौक दरम्यान जपानी बाजार, व इतर चैनीच्या वस्तुंची मुख्य बाजारपेठ आहे. सदर ठिकाणी **'दिपावली'** सणानिमीत्त नागरीकांची खरेदीसाठी मोठया प्रमाणात गर्दी होते. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून,** महाराष्ट्र शासन गृहविभाग एम.व्ही.ए. –११६/सी.आर/३७/टी.आर. दि.०७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) नेहरू चौक कडून शिरू चौक कडे जाणाऱ्या दुचाकी वगळून इतर वाहनांना **नेहरू चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर सर्व वाहने नेहरू चौकातून पुढे देवी भवानी चौक, गोल मैदान येथून उल्हासनग नं. १ मार्गे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) पटेल मार्ट कडून नेहरू चौक कडे जाणाऱ्या दुचाकी वगळून इतर वाहनांना **पटेल मार्ट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर सर्व वाहने हिरा मॅरेज हॉल पुढे मधुबन चौक, गोल मैदान मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दिनांक ०५/११/२०२३ ते दिनांक १५/११/२०२३ रोजी पर्यत दररोज दुपारी १३.०० ते रात्रौ २३.०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतुक अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( डॉ. विनयकुमार मे. राठोड )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर :–**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका.

CamScanner

**<u>प्रत कार्यवाहीसाठी</u> :—**
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उपायुक्त, परिमंडळ—४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

<u>प्रत</u> :— <u>पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर</u>
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

<u>प्रत</u> :— <u>समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे</u>
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

<u>प्रत</u> :— <u>संबंधित सपोआ वाहतूक उपविभाग./संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उप विभाग.</u>
२/— म.न.पा.उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner